MHYA150011802025

दाखल तारीख : २३.१२.२०२५
नोंदणी तारीख : २३.१२.२०२५
निकाल तारीख : १२.०३.२०२६
कालावधी : ०० व., ०२ म.,२१दि.

## प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नेर, ता. नेर, जि. यवतमाळ यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : जी. सी. फुलझळके)

**नियमित फौजदारी खटला क्र.१६३/२०२५ निशाणी क्र.१७/ब**

| | |
|---|---|
| प्रथम खबर क्रमांक | ६२४/२०२५ |
| अहवाल/गुन्हयाचा तपशील व पोलीस ठाणे | नेर पोलीस ठाणे,<br>ता. नेर, जि. यवतमाळ. |
| निकालाचा दिनांक | १२.०३.२०२६. |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकारतर्फे, नेर पोलीस ठाणे. |
| अभियोगपक्षातर्फे वकील | श्री. एस. एन. वानखडे,<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **१. शेख आदिल शेख अमान,**<br>वय – २७ वर्षे, व्यवसाय–मजुरी,<br>**२. शेख मोहसिन शेख अमान,**<br>वय – २४ वर्षे, व्यवसाय–मजुरी,<br>दोघे राहणार – चमन नगर नेर,<br>ता. नेर, जि. यवतमाळ. |
| आरोपीतर्फे वकील | श्री. मोहम्मद शारीक. |

## भाग 'ब'

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ४, परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १६.१२.२०२५. |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | १८.१२.२०२५. |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २३.१२.२०२५. |
| दोषारोप नोंदविल्याची तारीख | ०१.०१.२०२६. |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०१.०१.२०२६. |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही. |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | १२.०३.२०२६. |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही. |

मा. उच्च न्यायालाच्या दिनांक १४.०७.२०२२ रोजीच्या राजपत्राच्या अधिसुचना क्र. ०८०१/२०२२ नुसार

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेख आदिल | .... | .... | भा. न्या.सं. क. ११८(१), ११५(२), | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेख अमान, | | | ३५१(२)(३), ३५२ सह कलम ३ (५) | | | |
| २. | शेख मोहसिन शेख अमान, | .... | .... | भा. न्या.सं. क. ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२ सह कलम ३ (५) | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

## न्या य नि र्ण य

## (दिनांक माहे १२ मार्च, २०२६ रोजी पारीत)

आरोपींविरुध्द निश्चित करण्यात आलेल्या भारतीय न्याय संहितेचे कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२ सह कलम ३ (५) खालील दोषारोप सिध्दतेकरीता प्रस्तुत संपरीक्षा आहे.

### अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :–

२. दिनांक १६.१२.२०२५ रोजी तक्रारदार यांचे पती शेख इमरान हे कामावर गेलेले असल्याने सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास तक्रारदार त्यांची सासु नामे नशीम बानो यांना सांगितले की, त्यांच्या काकाचे मुलीचे लग्न असल्याने त्यांना माहेरी जाचे आहे. त्यावेळी आरोपी शेख आदिल व शेख मोहसीन तिथे हजर होते, त्यांनी तक्रारदार यांना माहेरी काय आहे तुझे तेथे कोणासोबत संबंध आहे का असे म्हटले. सदर लग्नाला जाण्याच्या कारणावरुन आरोपींनी तक्रारदार यांना शिवीगाळ केली. आरोपी मोहसिन याने तुझे तोंड जास्तच चालत आहे असे म्हणुन

तक्रारदार यांची गच्ची पकडुन खाली पाडले व दोन्ही आरोपींनी लाथा बुक्कीने मारहाण केली. आरोपी शेख आदिल याने लोखंडी पाईपने तक्रारदार यांच्या कमरेवर, हातावर मारहाण केली. आरोपींनी तक्रारदार यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे तक्रारदार यांनी नेर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली. सदरच्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द गुन्हा क्रमांक ६२४/२०२५ हा भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२ सह कलम ३(५) अन्वये नोंदविण्यात आला.

३. पोलीसांनी तपासादरम्यान पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा, जप्ती पंचनामा व अटक पंचनामा तयार केला. तक्रारदार व इतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा आढळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. आरोपींविरुध्द निशाणी क्र.१२ वर भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२ सह कलम ३(५) अन्वये दोषारोप निश्चित केले. निश्चित केलेले दोषारोप आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून दाखविले व समजुन सांगितले. आरोपींनी निश्चित केलेले दोषारोप अमान्य केले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | नजराना शेख इमरान – साक्षीदार क्र. १ | तक्रारदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| **अनु. क्र.** | **स्वरुप** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | तक्रारीवरील सही. | १५. |
| २. | छापील प्रथम खबरी अहवालावरील सही. | १६. |

**ब. बचाव पक्ष –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. मुद्देमाल –

| अनु. क्र. | मुद्देमालाचे वर्णन | निशाणी/आर्टिकल |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

५. साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपींच्या विरोधात जाणारा पुरावा आढळून न आल्याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे आरोपींचे निवेदन नोंदविण्यात आले नाही. संपरीक्षेदरम्यान अभियोगपक्षाने तक्रारदार यांना साक्षीदार म्हणुन तपासले. अभियोगपक्षातर्फे विद्वान सरकारी वकील श्री. एस. एन. वानखडे व आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. मोहम्मद शारीक यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील पुरावा तसेच, दोन्ही बाजुंचा युक्तीवाद लक्षात घेता, पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन आले, त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक १६.१२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजताचे सुमारास मौजे नेर, ता. नेर गावचे हद्दीत आरोपींनी आपसी संगणमत करुन तक्रारदार यांना लोखंडी पाईपने मारहान करुन दुखापत पोहचविली आणि भारतीय न्याय संहिताचे कलम ११८ (१) सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा केला काय ? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन तक्रारदार यांना | |

| | | |
|---|---|---|
| | लाथाबुक्यांनी मारहाण केली त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिताचे कलम ११५(२) सह कलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | **नाही.** |
| ३. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन तक्रारदार यांचेकडुन शांततेचा भंग व्हावा म्हणुन त्यांना जाणीवपुर्वक अपमानित करुन शिवीगाळ केली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिताचे कलम ३५२ सह कलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | **नाही.** |
| ४. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन तक्रारदाराच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविले आणि भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२)(३) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **नाही.** |
| ५. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ४ बाबत :-**

६. वरील चारही मुद्दे एकाच घटनेशी निगडीत आहेत. पुरावा तसेच विवेचनांची पुनरावृत्ती टाळणेकरिता वरील मुद्दयांची कारणमीमांसा एकत्रितरित्या करणे

सोयीचे व ईष्ट होईल.

७. अभियोगपक्षातर्फे तक्रारदार नजराना शेख इमरान यांना निशाणी क्र.१४ वर साक्षीदार क्र.१ म्हणुन तपासण्यात आले. तक्रारदार साक्षीदार क्र.१ यांनी सरतपासात नमुद केले की, ते आरोपींना ओळखतात. तक्रारदार यांनी पुढे नमुद केले की, घटना कशी व काय घडली हे त्यांना आठवत नाही. आरोपींसोबत त्यांची बोलचाल झाली होती. तक्रारदार यांनी तक्रारीवर त्यांची सही असल्याचे व तक्रारीतील मजकुर त्यांना माहित नसल्याचे नमुद केले. तक्रारदार यांनी अभियोगपक्षाला कोणतेही सहकार्य केले नसल्यामुळे अभियोगपक्षातर्फे तक्रारदार यांचा उलटतपास घेण्यात आला. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात तक्रारदार यांनी नमुद केले की, आरोपी व त्यांच्यात आपसी समझोता झाला आहे. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात अभियोगपक्षास पुरक असा कोणताही पुरावा उपलब्ध होवु शकला नाही.

८. अभियोग पक्षातर्फे तक्रारदार या महत्वाच्या साक्षीदारांचा पुरावा नोंदविण्यात आला. सदर महत्वाच्या साक्षीदारांनी अभियोगपक्षास समर्थन दर्शविले नसल्यामुळे अभिलेखावर आरोपींविरुध्द कोणताही पुरावा सादर होऊ शकला नाही. म्हणुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ अन्वये आरोपींचे बयाण न नोंदविण्याचा आदेश निशाणी क्र.१ वर पारीत करण्यात आला. आरोपींनी त्यांच्या बाजुने कोणीही साक्षीदार तपासले नाही.

९. येथे ही बाब करणे महत्वाची आहे की, अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या वरील महत्वाचे साक्षीदार तक्रारदार यांनी अभियोग पक्षास कोणतेही समर्थन

दर्शविले नाही. प्रस्तुत प्रकरणातील तक्रारीतील कथनाच्या अनुशंगाने तक्रारदार या साक्षीदारांनी कोणताही पुरावा सादर केला नाही. म्हणुन इतर साक्षीदारांना तपासण्यासाठी प्रकरण प्रलंबित ठेवले असले तरी देखील आरोपींविरुध्द दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे संपुर्ण संशयापलीकडे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला असता. बचावपक्षातर्फे घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा व वैद्यकीय दस्ताऐवज मान्य करण्यात आले. त्याद्वारे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याची कारवाई करण्यात आली होती ही बाब सिध्द होते, तसेच वैद्यकीय दस्तऐवजावरुन तक्रारदार यांचा वैद्यकीय उपचार झाला होता हया बाबी सिध्द होतात. मात्र आरोपींनी तक्रारदार यांना लोखंडी पाईपने डोक्यावर मारहान केली, लाथाबुक्यांनी मारहान केली, शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली होती हया बाबींबाबत अभिलेखावर कोणताही स्पष्ट व भक्कम पुरावा सादर नसल्याने सदरच्या बाबी सादर करण्यात आलेल्या पुराव्यावरुन सिध्द होत नाहीत.

१०. तात्पर्य असे की, दस्तुरखुद तक्रारदार यांनी अभियोग पक्षास कोणतेही समर्थन न दिल्यामुळे आरोपींविरुध्द दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे संपुर्ण संशयापलीकडे जावुन सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ करीता** :-

११. प्रस्तुत प्रकरणातील तथ्य, अभिलेखावर सादर करण्यात आलेला पुरावा व वरील मुद्दयांचा विविचनोउत्तर निष्कर्ष विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. **आरोपी क्र.१ शेख आदिल शेख अमान व आरोपी क्र.२ शेख मोहसिन शेख अमान** यांना भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२) ३५१(२)(३), ३५२ सह कलम ३ (५) खालील दोषारोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी रक्कम रूपये १५,०००/- प्रत्येकी वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा द्यावा.

४. जप्त मुद्देमाल एक लोखंडी पोकळ पाईप निरर्थक व मुल्यहीन असल्याने सदर मुद्देमाल अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2026.03.13 11:37:19 +0530

नेर, (जी. सी. फुलझळके)

दिनांक : १२.०३.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नेर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Ku. B. N. Nare (Grade-III) |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Ner. |
| Date | :- | 12/03/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | :- | 13/03/2026 |
| Judgment uploaded on | :- | 13/03/2026 |